।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

'A' Grade
(NAAC Re-accredited )
(3rd Cycle)

पत्रपेटी क्र. ८०, उमवि नगर, जळगाव

रौप्य महोत्सवी वर्ष २०१४-१५

## संशोधन व विकास

जा.क्र.उमवि/११ए/वेबसाइट/७७० /२०१७ दिनांक :-२७ /०६/२०१७

प्रति,

१) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक.

२) विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळांचे/विभागांचे मा.संचालक/विभागप्रमुख.

यांसी.....

**विषय :-** अध्यापकांनी विद्यापीठाकडे जमा केलेले जर्नल्स सदर्भात युजीसीने प्रसिध्द केलेले नोटीफिकेशन.

**संदर्भ :-** युजीसीचे पत्र D.O.No.F.१-१/२०१६(Secy), दिनांक ३० जानेवारी, २०१७.

महोदय/महोदया,

आपणास विदितच आहे की, मा.सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचेकडील वरील संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयातील/शैक्षणिक प्रशाळा/विभागातील अध्यापकाचे जर्नल्स विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत प्रसिध्द करणेसाठी आपणाकडून जर्नल्सची माहिती विहित नमुन्यात मागणी करण्यात आली होती.

विद्यापीठाकडे प्राप्त झालेले जर्नल्स मा.विद्यापीठ अधिकार मंडळाच्या मंजुरी नंतर मा.सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांना त्यांच्या वैयक्तिक ईमेलव्दारे पाठविण्यात आले आहे.

तथापी, विद्यापीठ अनुदान आयोगाने नुकतेच एक नोटीफिकेशन प्रसिध्द केलेले असून, प्रसिध्द केलेल्या नोटीफिकेशनमध्ये नमुद केल्यानुसार विद्यापीठे / महाविद्यालये यांचेकडून प्राप्त झालेले जर्नल्समधील काही जर्नल्स हे **बनावट किंवा संशयास्पद** असल्याच्या तक्रारी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे प्राप्त झालेल्या आहेत.

त्याअनुषंगाने मला प्राप्त झालेल्या आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, आपण विद्यापीठाकडे सादर केलेले अध्यापकांचे जर्नल्सची आपल्या स्तरावर तात्काळ पुनःश्च तपासणी करुन घेवून **बनावट किंवा संशयास्पद** जर्नल्सची माहिती सोबत जोडलेल्या नमुन्यात विद्यापीठास तात्काळ सादर करावी. जेणेकरुन आपण पाठवलेली **बनावट किंवा संशयास्पद** जर्नल्सची माहिती विद्यापीठ अनुदान आयोगाकडे सादर करणे सोईचे होईल.

तसेच आपण आपल्या महाविद्यालयातील अध्यापकांचे जर्नल्सची बनावट किंवा संशयास्पद नसल्याची खात्री करुन त्याबाबतची माहिती विद्यापीठास सादर न केल्यास याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची कृपया नोंद घ्यावी व विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती.

**टिप :-** मा.प्राचार्य/संचालक यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त बाब संबंधित अध्यापक व मार्गदर्शक यांच्या निदर्शनास आणून द्यावी ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव,
संशोधन व विकास